MHBI120014572022

## नियमीत दिवाणी दावा क्र. ३५१/२०२२ मधील नि.क्र. २५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी सदरचा दावा त्यांचे विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्याचा झालेला आदेश रदद करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी यासाठी दिलेला आहे.

२. उपरोक्त प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, प्रतिवादी यांना महत्वाची कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने ते न्यायालयात हजर राहु शकले नाहीत त्यामुळे प्रतिवादी क्र. २ ते ७ यांच्या विरुध्द दिनांक ०६.०१.२०२३, प्रतिवादी क्र. ८ यांच्या विरुध्द दिनांक २८.११.२०२३ रोजी व प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द दिनांक १५.०३.२०२४ झालेला एकतर्फा आदेश रदद करुन त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

३. अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वादी यांचे असे म्हणणे आहे की, सदर प्रकरणात काही प्रतिवादींना दिनांक ०२.०१.२०२३ रोजी व काही प्रतिवादींना त्यानंतर समन्सची बजावणी झालेली आहे व अर्जातील कारण संयुक्तीक नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावर दाखल कागपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी यांना समन्स प्राप्त झाल्यानंतर ते सदर प्रकरणात हजर झालेले नाहीत, त्यामुळे प्रतिवादी क्र. २ ते ७ यांच्या विरुध्द दिनांक ०६.०१.२०२३, प्रतिवादी क्र. ८ यांच्या विरुध्द दिनांक २८.११.२०२३ रोजी व

प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द दिनांक १५.०३.२०२४ एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी यांनी दावा त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश रदद करण्यासाठी योग्य कारण दर्शवलेले नाही. परंतु नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. दावा चालविण्यास प्रतिवादी यांच्यामुळे झालेल्या विलंबाची भरपाई प्रतिवादी यांच्यावर खर्चाचा अंमल करुन घेता येवू शकते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी वादी यांना रक्कम रु. १०००/- एवढा खर्च दिल्यानंतर त्यांचे विरुध्द झालेला दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश रदद करुन त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे. प्रतिवादी यांनी सदर खर्चाची रक्कम न चुकता पुढील तारखेस अथवा त्यापूर्वी वादी यांना अदा करावी.

NILESH MALAKAPPA WALI

Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2024.09.10 09:06:59 +0300

स्थळ-धारुर
दिनांक ०९.०९.२०२४

(निलेश एम.वाली )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
धारुर

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **लघुलेखक ग्रेड-३** | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०९.०९.२०२४ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | ०९.०९.२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | ०९.०९.२०२४ |

सही/-
(ए.एस.गंगणे )
लघुलेखक ग्रेड-३
दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर